| | | |
|---|---|---|
| | सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड, आयुक्तालय.<br>**प्रेसनोट दि. १९/०७/२०२३** | |

## जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पिंपरी चिंचवड पोलीस

### सांगवी पोलीसांचे उत्कृष्ठ तपासाने ५ आरोपी यांना न्यायालयाने दिली शिक्षा

सांगवी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं. १९९/२०११, भा.द.वि. कलम ३०४(अ), ३४. अन्वये गुन्हा दाखल होता. नमुद गुन्ह्याची थोडक्यात हकिकत अशी कि, दि. २९/११/२०१० रोजी सकाळी ११/०० वा. ते ३०/११/२०१० रोजी ०९/४० वा. चे सुमारास सामान्य रुग्णालय औंध कॅप, पुणे येथे फिर्यादी नामे भगवान दौलत वाकोडे वय- ४७ वर्षे, धंदा- ड्रायव्हर रा. रुम नं. ८, चाळ नं.८, सामान्य रुग्णालय कॉर्टरस, औंध कॅम्प, पुणे. यांची विवाहित मुलगी ही बाळंतपणासाठी सामान्य रुग्णालय औंध येथे ॲडमिट असताना तिचेवर उपचार करणारे व तपासणी करणारे स्त्रीरोग तज्ञ आरोपी २ डॉक्टर यांनी सदर महिलेच्या पोटात वेदना होत असताना फिर्यादी यांनी त्यांना समक्ष आरोपी डॉक्टरांना सांगीतले असताना फिर्यादी समक्ष असताना तिची तपासणी करणेस निष्काळजीपणा व हयगयी केली तसेच ३ अधिपरिचारीका यांनी त्याचे मुलीस पोटात होणाऱ्या त्रासाबाबत वारंवार सांगितले असताना त्यांनी डॉक्टरांना कळवण्यास हईगई व निष्काळजीपणा केला असल्यामुळे यातील ५ आरोपीतांचे निष्काजीपणा व हईगई मुळे फिर्यादी यांचे मुलीचे बाळ जन्मता मयत झाले. म्हणुन वरील २ डॉक्टर व ३ अधिपरिचारीका असे एकुण ५ आरोपींता विरुध्द भा.द.वि.कलम ३०४ (अ), ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता.

सदरचा गुन्हा सहा.पो.उप.निरीक्षक एल.एस.पोमण यांनी दाखल करुन पुढील तपास कामी सहा.पोलीस निरीक्षक पी.डी. भुजबळ यांना दिला होता. सदर गुन्ह्याचा तपास अतिशय उत्कृष्ठ रित्या करुन सदर गुन्ह्यातील महत्वाचे तांत्रीक व परीस्थीजन्य पुरावे कायदेशीर रित्या गोळा करुन वर नमुद पाच आरोपीतां विरुध्द चार्ज निश्चित करुन वरिष्ठांकडुन तपासणी करुन घेवुन मा. प्रथम वर्ग दंडाधिकारी सो, पिंपरी न्यायालय येथे सादर केले होते. सांगवी पोलीसांचे उष्कृष्ठ कामाचा परीपाक म्हणुन आज दि. १८/०७/२०२३ रोजी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिरी मे.एन.आर. गजभाये सो, पिंपरी न्यायालय, पुणे यांनी २ डॉक्टर आरोपी व ३ अधिचारीका आरोपी यांना भा.द.वि कलम ३०४(अ),३४ प्रमाणे दोषी ठरवुन २ वर्ष साधा कारावास व प्रत्येकी ५० हजार रुपये दंड तसेच १ लाख रुपये फिर्यादीची मुलगी हिस नुकसान भरपाई देणे अशी शिक्षा ठोठावली आहे.

या केस दरम्यान श्रीराम पौळ, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, सुनिल तांबे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांनी कोर्ट पैरवी अमंलदार प्रदिप सांबळे पो.हवा.९५५, राणी काळे, पोलीस अमंलदार २१४७ यांना वेळोवेळी मार्गदर्शन केलेले आहे.

सदरची कामगीरी बाबत मा.श्री विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त, मा.डॉ. संजय शिंदे, पोलीस सह आयुक्त, मा. वसंत परदेशी, अप्पर पोलीस आयुक्त, मा. डॉ. काकासाहेब डोळे, पोलीस उप आयुक्त, परी-२, मा. श्री विशाल हिरे, सहा. पोलीस आयुक्त, यांनी तत्कालीन तपासी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक पी.डी. भुजबळ, कोर्ट पैरवी अमंलदार प्रदिप सांबळे पो.हवा.९५५ व राणी काळे, पोलीस अमंलदार २१४७, यांचे चांगले कामाबद्दल अभीनंदन केले आहे.

काकासाहेब डोळे
पोलीस उप आयुक्त परी-२,
पिंपरी चिंचवड आयुक्तालय.